## *हर घर तिरंगा ...*

### *'हर घर तिरंगा या अभियाना अंतर्गत अहमदनगर महानगरपालिका व जय श्रीराम रनर्स ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने 'भव्य मॅरेथॉन रन' मोठ्या उत्साहात पार पडला*

समाचार

### मनपाचे शहरात हर घर तिरंगा अभियान

# स्वाक्षरी मोहीम, मॅरेथॉन रनला मोठा प्रतिसाद

**समाचार/नगर-दि.१४**

केंद्र शासनाच्या निर्देशानुसार शहरात १३ ते १५ ऑगस्ट कालावधीत मनपाच्यावतीने हर घर तिरंगा अभियान राबविण्यात येत आहे. यात नागरिकांना सहभागी करून घेण्यासाठी मनपा विविध उपक्रम राबवित आहे. मंगळवारी या अभियानाच्या जनजागृतीसाठी मनपा, अशोका आर्ट फाऊंडेशन व अहमदनगर आर्ट क्लब यांच्यावतीने प्रोफेसर चौक येथे स्वाक्षरी मोहिम पार पडली. तर आज सकाळी मनपा व श्रीराम रनर्स ग्रुपच्यावतीने ब्लॅक एलिफंट भुईकोट किल्ल्याजवळ मॅरेथॉन रनचे आयोजन करण्यात आले होते. या मोहिमेत नागरिकांसह, विद्यार्थी,



अंध व दिव्यांग बांधवांनी उत्फूर्तपणे सहभाग घेतला.

उपायुक्त विजय मुंढे, आस्थापना विभागप्रमुख मेहेर लहारे, चित्रकार अशोक डोळस यांच्या हस्ते या मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी नागरिकांनी या अभियानात सहभागी होऊन स्वाक्षरी मोहिमेला प्रतिसाद दिला. मनपा अधिकारी, कर्मचारी यांच्यासह अभियानात विशेषत: विद्यार्थ्यांनी मोठा सहभाग घेतला. त्यानंतर बुधवारी सकाळी मनपा व श्रीराम रनर्स ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने ब्लॅक एलिफंट भुईकोट किल्ल्याजवळ मॅरेथॉन रनचे आयोजन करण्यात आले होते. उपायुक्त विजय मुंढे, आस्थापना विभागप्रमुख मेहेर लहारे, उद्योजक गौरव फिरोदिया यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून या मॅरेथॉनचा शुभारंभ करण्यात आला. या मॅरेथॉन रनमध्ये नागरिकांसह अंध व दिव्यांग व्यक्तींनी सहभाग नोंदवला. हर घर तिरंगा अभियानाच्या निमित्ताने आज सायंकाळी सहा वाजता झोपडी कॅन्टीन, सावेडी येथील माऊली संकुल सभागृहात देशभक्तीपर गीतांच्या सुरेल मैफलीचे आयोजन मनपाने केले आहे. या कार्यक्रमात देशासाठी कार्य करणाऱ्या शहरातील स्वातंत्र्य सेनानींचा सन्मानही करण्यात येणार आहे. या कार्यक्रमास उपस्थित रहावे, असे आवाहन उपायुक्त मुंढे यांनी केले आहे.



लोकमत



महापालिकेतर्फे आयोजित मॅरेथॉन रन उपक्रमात सहभागी झालेले स्पर्धक.

# 'हर घर तिरंगा'साठी मॅरेथॉन रन

## महापालिकेचा उपक्रम : नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

लोकमत न्यूज नेटवर्क

**अहमदनगर :** केंद्र शासनाच्या निर्देशानुसार शहरात १३ ते १५ ऑगस्ट या कालावधीत 'हर घर तिरंगा' अभियान राबविण्यात येत आहे. या उपक्रमात लोकसहभाग वाढविण्यासाठी महानगरपालिका विविध उपक्रम राबवत आहे.

या अभियानाच्या जनजागृतीसाठी मंगळवारी मनपा, अशोका आर्ट फाउंडेशन व अहमदनगर आर्ट क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने प्रोफेसर चौक येथे स्वाक्षरी मोहीम राबविण्यात आली. बुधवारी सकाळी मनपा व श्रीराम रनर्स ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने किल्ल्याजवळ मॅरेथॉन रनचे आयोजन करण्यात आले होते.

या मोहिमेमध्ये नागरिकांसह विद्यार्थी, अंध व दिव्यांग बांधवांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला.

उपायुक्त विजयकुमार मुंढे, आस्थापना विभाग प्रमुख मेहेर लहारे, चित्रकार अशोक डोळसे यांच्या हस्ते मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी नागरिकांनी या अभियानात सहभागी होऊन स्वाक्षरी मोहिमेला प्रतिसाद दिला.

मनपाचे अधिकारी, कर्मचारी यांच्यासह विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सहभाग घेतला.

स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला महापालिकेच्या वतीने देशभक्तीपर गीतांच्या कार्यक्रमाला रसिकांचा मोठा प्रतिसाद...

जिल्हाधिकारी, आयुक्तांसह अधिकारी कर्मचारी,




'स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला' अहमदनगर महानगरपालिका आयोजित 'हर घर तिरंगा' या अभियाना अंतर्गत
देशभक्तीपर
देशासाठी कार्य करणाऱ्या शहरातील
स्वातंत्र्यसेनानींचा
Shot on vivo S1
AI Triple Camera


M.S.
11
'स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला' अहमदनगर महानगरपालिका आयोजित 'हर घर तिरंगा' या अभियाना अंतर्गत
देशासाठी कार्य करणाऱ्या शहरातील
स्वातंत्र्यसेनानींचा
Shot on vivo S1
AI Triple Camera


'स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला' अहमदनगर महानगरपालिका आयोजित 'हर घर तिरंगा' या अभियाना अंतर्गत
देशभक्तीपर
देशासाठी कार्य करणाऱ्या शहरातील
स्वातंत्र्यसेनानींचा
Galaxy A32
14 August 2024 8:30 pm


देशासाठी कार्य
दि. १४ ऑगस्ट
वाजता
नगरपालिका, अहमदनगर
Shot on vivo S1
AI Triple Camera


देशभक्तीपर
कार्य करणाऱ्या शहरातील
सोहळा
Shot on vivo S1
AI Triple Camera